बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०२ । अंक – ३५४ । वार सोमवार दि १५ सप्टेंबर एएचएमएआर /२०२३/८३९६५ । किंमत ३ रू. । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 02 Issue - 354 Monday 15 September 2025 RNI : MAHMAR/2023/83965 Price - 3 Rupees Pages 4

# आपळ सारी एक, आपळो लढा एक, हक्क मळेशिवाय शांत बेशेरो कोणी, आपळेन नाय चावचं, अन्याय झेलेरो कोणी!




सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

● संपादक :– दिपक थोरात मो.९८६०८९८५६४

### खासदारापासून सर्व आमदार झाले एकदिलाने, बंजारा समाजाच्या मागणीला उघड पाठिंबा!

बंजारा समाजाच्या एसटी प्रवर्गातील आरक्षणाच्या मागणीवरून मोठं राजकीय वादळ उठलं आहे. खासदार बजरंग सोनवणे यांनी बंजारा समाजाच्या मागणीला उघड पाठिंबा जाहीर केला आहे. एवढंच नव्हे, तर माजी मंत्री धनंजय मुंडे प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून समाजाच्या मोर्चात सामील झाले आहेत. फक्त एवढंच नाही तर आमदार सुरेश धस, आमदार विजयसिंह पंडित आमदार संदिप क्षीरसागर यांच्यासह जिल्ह्यातील सहा आमदारांनी बंजारा समाजाच्या हक्कासाठी लढण्याची तयारी दाखवली आहे. राजकीय पटावर विरोध–सत्ताधारी भेद विसरून सगळे एकवटले हेच या आंदोलनाचं वैशिष्ट्य ठरत आहे. बंजारा समाजाच्या मोर्चात प्रत्यक्ष उपस्थित राहून धनंजय मुंडे यांनी सरकारला थेट सुनावलं आहे. हा समाज रस्त्यावर उतरला आहे, त्याला डावलणं शक्य नाही. एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळालंच पाहिजे.

# बीडमध्ये मराठ्यानंतर बंजारा समाजाची जनशक्ती उसळली, समाजाच्या ताकदीनं सरकारच्या छातीत धडकी

**आम्हाला न्याय द्या, एसटी आरक्षण हक्क आहे, भीक नाही आरक्षण मिळालंच पाहिजे, अशा गगनभेदी घोषणा देत बंजारा समाजाची सरकारला थेट गर्जना!**

**बंजारा समाजाने धडाकेबाज ताकद दाखवली; एसटी प्रवर्गातील आरक्षणासाठी रस्त्यावर जनसागर**

**तालुक्यापासून-तांड्यापर्यंतचा समाज उठला; प्रत्येक कोपऱ्यातून आलेल्या जनतेनं मोर्चा प्रचंड फुलवला!**







बीड (प्रतिनिधी):– राज्यात मराठा समाजाला हैदराबाद गॅझेटियरचा आधार घेत ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याचा निर्णय सरकारने घेतल्यानंतर नवे समीकरण घडू लागले आहे. मराठा बांधवांना 'कुणबी' प्रमाणपत्राचा मार्ग खुला झाला असतानाच आता बंजारा समाजानेही ताकद दाखवायला सुरुवात केली आहे. जर गॅझेटियर नोंदीचा आधार घेऊन मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातील आरक्षण मिळू शकते, तर आम्हालाही त्याच गॅझेटियर नोंदीच्या आधारावर एसटी प्रवर्गातून आरक्षण का मिळू नये? असा थेट सवाल बंजारा समाजाने उपस्थित केला आहे. आज बीडमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयावर बंजारा समाजाच्या हजारो बांधवांचा प्रचंड मोर्चा धडकला. पांढऱ्या झेंड्यांनी गगनभेदी घोषणाबाजी करत हजारो बंजारा बांधव एकवटले. बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून, प्रत्येक तांड्यातून आलेल्या समाजबांधवांनी मोर्चा फुलून गेला.

मराठा आरक्षण लढ्याचं केंद्रस्थान असलेल्या बीड जिल्ह्यातच आज बंजारा समाजाने आपली ताकद दाखवत राजकीय नेत्यांनाही धडकी भरवली. उपोषणकर्ते मनोज जरांगे–पाटील यांच्या आंदोलनाला जसा जिल्हाभरातून जनसमर्थन मिळालं होतं, तसाच जनसागर आज बंजारा समाजाच्या मागणीसाठी रस्त्यावर उतरला. मोर्चात महिलांची, तरुणांचीही मोठी उपस्थिती होती. आम्हाला न्याय द्या, एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळालंच पाहिजे, गॅझेटियर आमचाही पुरावा आहे. अशा गगनभेदी घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणून गेला. दरम्यान, सर्वात महत्वाचं म्हणजे, या मोर्चाकडे बहुतांश राजकीय नेत्यांनी पाठींबा दर्शविला आहे. बंजारा समाजाने करत स्वतःच्या एकजुटीवर भर दिला. बीड जिल्हा हा आधीच आरक्षणाच्या संघर्षाने पेटलेला. मराठा–ओबीसी समाज आमनेसामने उभा ठाकलेला. त्यात आता बंजारा समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नाने राजकारणाला आणखी पेटवण्याची चिन्हं स्पष्ट दिसू लागली आहेत.

आम्ही आमच्या मागणीसाठी अजून मोठ्या ताकदीने रस्त्यावर उतरणार, आमच्या समाजाला एसटी प्रवर्गातून न्याय मिळालाच पाहिजे! अशी गर्जना आजच्या मोर्चातून झाली. एकंदरीत, बीडमध्ये आजचा बंजारा समाजाचा मोर्चा हा केवळ निदर्शने नव्हता, तर हा समाजाच्या एकतेचा आणि ताकदीचा भव्य प्रदर्शन होता. राज्य सरकारसमोर आता मोठं आव्हान उभं राहिलं आहे. मराठा आरक्षणाबरोबरच बंजारा समाजाचं आंदोलन हाताळायचं कसं?

# पोलिस प्रशासनास तीन दलित तरुणाचा जीव घ्यायचा का?

**दलित महिला अत्याचार प्रकरण, तेरा दिवस पासुन आरोपी मोकाट**

**एका उपोषण कर्त्याची तब्येत खालावली,उपचार घेण्यास नकार**

**एसपी साहेब आल्या शिवाय आम्ही उपोषण सोडणार नाही उपोषणकर्त्य भूमिकेवर ठाम**





तलवाडा (प्रतिनिधी):– गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन अंतर्गत तळवट बोरगाव येथील एका २७ वर्षीय महिलेस गावातील एका आरोपी सोमनाथ दिलीप गाडे रा तळवट बोरगाव याने छेडछाड पान २ वर...

### तलवाडा कडकडीत बंद


तळवट बोरगाव येथील घटना जिल्हा भर गाजत असताना विविध संघटने कडून तलवाडा बंद पुकारण्यात आला असून तलवाडा बंद १००% पुकारण्यात आला असून एकाही दुकान दार ने दुकान उघडले नाही व या आंदोलनात सहभागी झाले होते या मध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे शेख खिजर, डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया चे मदन हातागळे, बहुजन लहुजी क्रांती चे दादाराव रोकडे, मानवी हक्क अभियान चे धोंडीबा हातागळे, महाराष्ट आधार सेनेचे अर्जुन साबळे, यांनी आरोपीस कडक कायदा करण्यात यावा या साठी पाठिंबा देण्यात आला तलवाडा बंद पुकारण्यास आवाहन केले होते


# बीडमध्ये मुसळधार!


## ● माजलगाव धरणाचे ११ दरवाजे उघडले!

बीड (प्रतिनिधी):– गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात सर्वत्र पावसाने जोरदार हजेरी लावली असून अनेक जिल्ह्यांत पूरस्थिती निर्माण झाली आहे. या मुसळधार पावसाचा सर्वाधिक फटका बीड जिल्ह्याला बसला असून सलग दोन दिवस पावसाने जनजीवन विस्कळीत केले आहे. मध्यरात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जिल्ह्यातील अनेक तालुक्यांत पूरस्थिती निर्माण झाली आहे. नदी–नाले दुथडी भरून वाहत असून काही ठिकाणी ढगफुटी सदृश्य पावसामुळे गावांचा संपर्क तुटला, तर शेतीसह जनजीवन विस्कळीत झालं आहे.

दरम्यान, बीड जिल्ह्यात सलग दुस–या दिवशी सुरू असलेल्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. बीड, गेवराई, पाटोदा, शिरूर आणि आष्टी तालुक्याला मध्यरात्रीपासून सुरू असलेल्या पावसाने झोडपून काढले आहे. आष्टी तालुक्यात रात्री झालेल्या मुसळधार पावसाने ढगफुटी सदृश्य परिस्थिती निर्माण झाली. देवळाली गावात मोठ्या प्रमाणात पाणी शिरले असून परिसरातील सुलेमान देवळा, दौलावडगावसह तब्बल ३० गावांचा संपर्क तुटलाय. नदी–नाले धोक्याची पातळी ओलांडून वाहू लागले आहेत. बीड–अहिल्यानगर महामार्गावरील धानोरा येथील कांबळी नदीला पूर आल्याने पान २ वर...







आरंभ

संपादकीय

बीड (महाराष्ट्र) सोमवार दिनांक १५ सप्टेंबर २०२५



## संपादकीय...

# आता अभियंत्यांसमोर तंत्रज्ञानाबरोबरच 'नैतिक' आव्हान!

गभरातील अभियांत्रिकी क्षेत्राचे स्वरूप सतत बदलत आहे. विसाव्या शतकात अभियांत्रिकीने जगात मोठी क्रांती घडवून आणली. सुरुवातीला, हेन्री फोर्डच्या असेम्बली लाईनमुळे मोठ्या प्रमाणावर उत्पादन शक्य झाले. यामुळे गाड्या आणि इतर वस्तू स्वस्त झाल्या. यानंतर, नागरी अभियांत्रिकीने मोठे पूल, धरणे आणि गगनचुंबी इमारती बांधल्या. दुसऱ्या महायुद्धानंतर, अणुऊर्जा आणि अवकाश संशोधनाला गती मिळाली.

मानवाला चंद्रावर पाठवणे, हे एक मोठे यश होते. शतकाच्या उत्तरार्धात, ट्रान्झिस्टर आणि मायक्रोप्रोसेसरच्या शोधाने डिजिटल युगाचा पाया रचला. २०००च्या दशकात, भारतीय अभियांत्रिकी क्षेत्रात एक नवीन युग सुरू झाले. माहिती तंत्रज्ञान आणि संगणक अभियांत्रिकीच्या आगमनाने या क्षेत्राला नवीन दिशा मिळाली. भारताने सॉफ्टवेअर विकास, आउटसोर्सिंग आणि माहिती तंत्रज्ञान सेवांमध्ये जागतिक पातळीवर आपली ओळख निर्माण केली. आयटी क्षेत्रात प्रचंड रोजगार संधी निर्माण झाल्या आणि इलेक्ट्रॉनिक्स, दूरसंचार आणि जैवतंत्रज्ञान यांसारख्या नवीन शाखांचा विकास झाला. पारंपरिक अभियांत्रिकी शाखांमध्येही आधुनिकीकरण आणि ऑटोमेशनचा वापर वाढला. कामाची गती आणि गुणवत्ता सुधारली. या काळात, भारताने अनेक प्रकल्पांमध्ये (उदा. मेट्रो रेल्वे आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ) आपली तांत्रिक क्षमता दर्शविली.

सध्या, अभियांत्रिकी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, डेटा सायन्स, रोबोटिक्स, ड्रोन आणि सायबर सुरक्षा यांसारख्या नवीन शाखांचा उदय झाला आहे. यामुळे केवळ पारंपरिक उद्योगांमध्येच नव्हे, तर आरोग्यसेवा, वित्त, मनोरंजन आणि कृषी क्षेत्रातदेखील अभियंत्यांची मागणी वाढली आहे. पारंपरिक अभियांत्रिकीच्या कल्पनाही बदलत आहेत. उत्पादन क्षेत्रात डिजिटल तंत्रज्ञानाच्या एकत्रीकरणामुळे स्मार्ट कारखाने स्वायत्त रोबोट्स, डेटा नालिटिक्स आणि रिअल-टाइम मॉनिटरिंगसह सुसज्ज झाले आहेत. या घडामोडींमुळे केवळ उत्पादकता वाढली नाही तर मानवी चुका कमी झाल्या आणि उत्पादनाची गुणवत्ता सुधारली.

याचबरोबर इंटरनेट ऑफ थिंग्ज (खेढ) आणि क्लाउड कंप्युटिंगसारख्या तंत्रज्ञानांनी उत्पादनांना आणि सेवांना जोडले. दैनंदिन जीवनातील अनेक समस्यांवर नावीन्यपूर्ण उपाय शोधले जात आहेत. यामुळे, अभियंत्यांना केवळ तांत्रिक ज्ञानच नाही, तर व्यवस्थापन, संवाद आणि समस्या सोडवण्याचे कौशल्यदेखील आवश्यक झाले आहे.

भविष्यात, अभियांत्रिकी क्षेत्र अधिक वैयक्तिकृत आणि शाश्वत बनणार आहे. क्वांटम कंप्युटिंगसारख्या तंत्रज्ञानामुळे डेटा विश्लेषण आणि गणना (उेाींरींळेप) अधिक वेगाने शक्य होईल. बायोइंजिनिअरिंग आणि नॅनो टेक्नॉलॉजी या शाखांचा प्रभावी वापर मानवी आरोग्य सुधारण्यासाठी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी केला जाईल. २०४० पर्यंत, रोबोटिक्स आणि टोमेशन अनेक उद्योगांमध्ये मानवी श्रमाची जागा घेतील, ज्यामुळे अभियंत्यांचे काम अधिक संशोधनात्मक आणि धोरणात्मक बनेल. ग्रीन एनर्जी आणि सर्क्युलर इकॉनॉमी यांसारख्या संकल्पनांमुळे पर्यावरण अनुकूल उत्पादने आणि प्रक्रिया विकसित करण्यावर भर दिला जाईल. भविष्यातील अभियंत्यांना सायबर सुरक्षा आणि नैतिकता यांसारख्या विषयांचे ज्ञान असणे आवश्यक आहे, कारण तंत्रज्ञानाचा वापर मानवी जीवनावर थेट परिणाम करणार आहे.

भारतीय अभियांत्रिकी क्षेत्राचा प्रवास पारंपरिक ते आधुनिक आणि स्थानिक ते जागतिक असा राहिला आहे. भविष्यात, हे क्षेत्र केवळ तंत्रज्ञानाच्या प्रगतीपुरते मर्यादित राहणार नाही, तर मानवी जीवनातील आव्हानांवर नावीन्यपूर्ण आणि नैतिक उपाय शोधण्याचे केंद्र बनेल. अभियंते हे तंत्रज्ञानाचे आधारस्तंभ आहेत आणि त्यांच्या नवनवीन शोध व निर्मितीमुळे समाजाचे जीवनमान सुधारते. बदलत्या जमान्याची पावले ओळखून त्यानुसार स्वतःला बदलत राहणाऱ्या, नवनवीन कौशल्ये शिकत राहणाऱ्या आणि अर्थातच थोडा वेगळा ऊर्फ 'हटके' विचार करणाऱ्या अभियंत्यांना कायम 'अच्छे दिन' येणार. गरज आहे ती मानसिकता बदलायची. आजच्या अभियांत्रिकी दिवसाचा हाच संदेश आहे.

# पुरग्रस्तांच्या पाठीशी 'शिवछत्र' परिवार खंबीरपणे उभा आहे - अमरसिंह पंडित

## पूरग्रस्त भागाची आ. विजयसिंह पंडित आणि अमरसिंह पंडित यांनी पाहणी करून दिला धिर



गेवराइ (प्रतिनिधी) :- सरासरी पेक्षा अधिक झालेला पाऊस आणि नाथसागरातून गोदावरी पात्रात १ लाख १३ हजार क्युसेस पाणी सोडल्याने गेवराई तालुक्यातील गोदावरी नदीकाठच्या गावांमध्ये पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झाली असून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांन पूरग्रस्त भागाची पाहणी करून शेतकरी व नागरिकांना धीर दिला. पुरामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शासकीय मदत मिळवून देण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. काळजी करू नका शिवछत्र परिवार तुमच्या पाठीशी आहे,अशी ग्वाही त्यांनी यावेळी देऊन प्रशासकीय अधिकाऱ्यांना सुचना केल्या, यावेळी तहसीलदार संदीप खोमणे, भाऊसाहेब नाटकर यांच्यासह महसूल विभागाचे कर्मचारी, संबंधित गावातील पदाधिकारी, ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

अचानक झालेली अतिवृष्टी, मुसळधार पाऊस आणि पैठण येथील नाथसागरातून सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे गेवराई तालुक्यातील गोदाकाठावरील गावामध्ये पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी पाण्याखाली गेल्या असून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांनी गोदावरी नदी काठावरील राजापूर, काठोडा, सावळेश्वर, म्हाळस पिंपळगाव, कटचिंचोली यासह गोदावरी नदीकाठच्या गावातील नुकसानीची पाहणी करून पंचनामे करण्याचे निर्देश यावेळी प्रशासनाला दिले. गेवराई विधानसभा मतदारसंघात काल रात्री अतिवृष्टी झाल्यामुळे शेती आणि पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. गोदावरी नदी आणि उपनद्यांना पूर आल्यामुळे अनेक ठिकाणी विशेषतः गोदावरी नदीकाठच्या भागांमध्ये अनेक गावांचा संपर्क तुटला असून गेवराई - राक्षसभुवन रस्त्यावरील गंगावाडी नजीकच्या पुलावर अमृता नदीचे पाणी आल्यामुळे या भागातील रहदारी बंद आहे. अनेक ठिकाणी महापुराचे पाणी लोकांच्या घरात गेल्यामुळे शेतीबरोबरच घरांचेही नुकसान झालेले आहे. मागील दोन दिवसांपासून शेतात पाणी साठून राहिल्यामुळे उभ्या पिकांचेही मोठे नुकसान झालेले आहे. त्यामुळे शेती, उभी पिके, पशुधन, शेतातील गोठे, शेतघर यासह वाडी, वस्त्यावरील राहती घरे यांचे अतिवृष्टी, मुसळधार पाऊस आणि महापुरामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे अमरसिंह पंडित यांनी प्रशासनाला निर्देश दिले. गेवराई विधानसभा मतदारसंघातील गोदाकाच्या भागांमध्ये सरासरीपेक्षा अधिकचा पाऊस अक्षरशः ढगफुटी सारखा झाल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली. गव्हाणथडी, काळेगाव ता. माजलगाव यासह संपूर्ण गेवराई विधानसभा मतदारसंघात ज्या ज्या ठिकाणी अतिवृष्टी आणि महापुरामुळे नुकसान झालेले असेल त्या सर्व नुकसानग्रस्तांना शासनाकडून नुकसान भरपाई मिळवून देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी सांगितले.

# मान्सून तिबेटात, धस्स भारतात! मानवी उपद्व्यापच कारणीभूत

केवळ भारतच नव्हे, तर जवळपास संपूर्ण दक्षिण आशियासाठी निसर्गाचे वरदान असलेल्या नैऋत्य मान्सूनने यावर्षी उत्तर भारतात अक्षरशः थैमान घातले आहे. पंजाबमधील पूरस्थिती अजूनही गंभीरच आहे. त्या राज्यातील एकूण २३ पैकी २२ जिल्ह्यांना पुराचा जबर तडाखा बसला असून, मृतांचा आकडा ५५वर पोहोचला आहे. देशाचे धान्याचे कोठार संबोधले जाणाऱ्या पंजाबमधील शेतीच्या अतोनात नुकसानामुळे आगामी काळात अन्नधान्याचा तुटवडा भासेल की काय, अशी शंकेची पाल चुकचुकायला लागली आहे.



हिमालयालगतच्या सर्वच राज्यांना यावर्षी अतिवृष्टी आणि ढगफुटीच्या घटनांचा मोठा फटका बसला आहे. एकट्या हिमाचल प्रदेशात २० जूनपासून आतापर्यंत पाऊस व पुराने ३८० जणांचा बळी घेतला असून, ५५ जण बेपत्ता आहेत. उत्तर भारतातील राजस्थान, हरयाणा या राज्यांनाही पावसाने जबर तडाखा दिला आहे. पंजाब, हरयाणा आणि राजस्थानातील काही भागांत तर वार्षिक सरासरीच्या कित्येक पट पाऊस अवघ्या २४ तासांत कोसळला आहे. भारतीय द्वीपकल्पातील महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणा यांसारख्या राज्यांतही यावर्षी पावसाने कहर केला आहे.

जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलांना त्यासाठी कारणीभूत ठरवले जात असतानाच, यावर्षी मान्सून तिबेटपर्यंत पोहोचल्याची चिंतेत आणखी भर घालणारी बातमी हवामानशास्त्रज्ञांनी दिली आहे. दक्षिण आशियातील बहुतांश भागात पाऊस पाडणारे नैऋत्य मोसमी वारे हिंद महासागर, अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरावरून वाहत येतात आणि हिमालयापर्यंत प्रवास करतात.

भारताच्या उत्तर सीमेवर एखाद्या तटबंदीसारखा उभा असलेला हिमालय मोसमी वारे अडवतो आणि त्यामुळे भारतात पाऊस पडतो; परंतु यावर्षी मात्र मोसमी वाऱ्यांनी तटबंदी भेदून, चक्क तिबेटला धडक दिल्याचे कृत्रिम उपग्रहांनी घेतलेल्या छायाचित्रांमध्ये दिसत आहे. या अभूतपूर्व नैसर्गिक घडामोडीसाठी नैऋत्य मोसमी वारे आणि पश्चिमी विक्षोभांची युती कारणीभूत ठरल्याचे हवामान तज्ज्ञांचे मत आहे.

पश्चिमी विक्षोभ ही एक कमी दाबाशी निगडित हवामान प्रणाली असून, तिचा उगम भूमध्य समुद्रानजीक होतो आणि ती पूर्वेकडे प्रवास करते. पश्चिमी विक्षोभ वातावरणाच्या वरच्या स्तरातील थंड हवा सोबत आणतात. ते सर्वसाधारणपणे हिवाळ्यात निर्माण होतात आणि उत्तर भारतात हिवाळ्यात होणारा पाऊस व हिमवर्षावासाठी कारणीभूत ठरतात. यावर्षी मात्र जूनपासून आतापर्यंत एकूण १९ पश्चिमी विक्षोभ नोंदले गेले आहेत. त्यांनी आणलेल्या थंड हवेचा वातावरणाच्या खालच्या स्तरातील तुलनेने उबदार आणि आर्द्रतायुक्त मोसमी वाऱ्यांशी संगम झाल्यास, तीव्र हवामान घडामोडी होऊन प्रचंड प्रमाणात पाऊस कोसळतो.

यावर्षी उत्तर भारतात पावसाने मांडलेला उच्छाद आणि मान्सून तिबेटच्या पठारापर्यंत पोहोचण्यामागे हे प्रमुख कारण असल्याची मांडणी हवामान तज्ज्ञ करीत आहेत. हे प्रकरण दुर्मीळ घडामोड या श्रेणीपुरते मर्यादित राहिले तर उत्तम; परंतु काही हवामान तज्ज्ञांना ती नियमित घडामोड ठरण्याची भीती वाटत आहे आणि दुर्दैवाने तसे घडल्यास, भारतासाठी ती अत्यंत वाईट बातमी ठरेल.

तिबेट हे एक थंड पठार आहे. तिथे बर्फवृष्टी होते; पण पाऊस अत्यंत कमी पडतो. पश्चिमी विक्षोभ आणि नैऋत्य मोसमी वाऱ्यांच्या संगमातून तिथे नियमितपणे मोसमी वारे पोहोचू लागल्यास, संपूर्ण पर्यावरणीय प्रणालीतच बदल संभवतील.

तिबेटमध्ये जास्त पाऊस पडू लागल्यास हिमनद्या वितळण्याच्या प्रक्रियेस वेग येईल आणि तिबेटमधून भारतात वाहत येणाऱ्या नद्या प्रलयंकारी पूरस्थिती निर्माण करू शकतील. शिवाय भारतातील एकूण पर्जन्यवृष्टीत ८० टक्के वाटा उचलणारा नैऋत्य मोसमी पाऊस तिबेटपर्यंत पोहोचल्यास, भारतातील पर्जन्यवृष्टीवर विपरीत परिणाम होऊन, त्यावर विसंबून असलेली शेतीच धोक्यात येईल. त्याचप्रमाणे भूजलपातळी घसरून पेयजल संकटही उभे ठाकू शकेल. थोडक्यात, द्वीपकल्पात दुष्काळ आणि उत्तर भारतात ओला दुष्काळ, हे चित्र कायमस्वरूपी होऊ शकेल.

अर्थात, तिबेटमध्ये मान्सून पोहोचणे ही एक दुर्मीळ घडामोड आहे, की यापुढे नियमितपणे तसे घडेल, यासंदर्भातील निष्कर्ष घाईघाईत काढता येणार नाही. त्यासाठी आणखी काही काळ जाऊ द्यावा लागेल. मानवाने आपल्याच हाताने आपले अस्तित्व धोक्यात आणले आहे, हे मात्र नक्की; कारण या घडामोडींसाठी प्रामुख्याने मानवी उपद्व्यापच कारणीभूत आहेत !

पान ४ वरून..

### स्थानिक गुन्हे शाखा बीड ने दिवसा घर फोडी करणारा आरोपी केला जेरबंद

व अमंलदार यांनी सापळा रचुन संशयीत आरोपी नामे नोटया ऊर्फ गोठया ऊर्फ रामदास जपान काळे रा. वाकी ता.आष्टी.जि.बीड यास दिनांक १२.०९.२०२५ रोजी वागजई शिवार वाकी ता. आष्टी जि. बीड येथुन ताब्यात घेवुन त्याचे कडुन १) पोलीस स्टेशन बर्दापुर गुरंन २०५/२०२५ कलम ३०५ (अ) ३३१ (३) बी.एन.एस. २) अमळनेर गुरंन १४८/२०२५ कलम ३०५ (अ) ३३१ (३) बी.एन.एस अन्वये उघड करुन नमुद गुन्हयात चोरी गेलेले सोन्याचे दागिने असा एकुण ९४,०००/-रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर आरोपीकडुन आणखी गुन्हे उघडकिस येण्याची शक्यता आहे. इतर आरोपीतांचा शोध कामी पथक रवाना केले आहेत. पुढील तपास पोलीस स्टेशन बर्दापुर येथील अधीकारी व अमंलदार करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, बीड चे पोलीस निरीक्षक श्री शिवाजी बंटेवाड, श्रीराम खटावकर पोलीस उप-निरीक्षक, पोलीस हवालदार अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, बाळु सानप, राहुल शिंदे, आनंद मस्के, अर्जुन यादव, सय्यद अश्फाक, मनोज परजणे, सचिन आंधळे, अश्वीनकुमार सुरवसे यांनी केली आहे

------------------

### पालकमंत्री अजितदादा जिल्हा परिषदेच्या आदर्श शिक्षकांचा पुरस्काराचा मान रखडला !

कामाचे कौतुक केले जाते. चांगले काम करणाऱ्या शिक्षकांचा उत्साह वाढवावा म्हणून त्यांना जिल्हा परिषद शिक्षक पुरस्कार सन्मान दिला जातो मात्र बीड जिल्हा परिषद व तेथील कर्मचारी अधिकारी यांना या सोहळ्याचा विसर पडल्याचे चित्र निर्माण झाले आहे. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार एक शिस्तप्रिय कर्तव्यदक्ष आणि प्रामाणिक पालकमंत्री म्हणून त्यांची ओळख महाराष्ट्रभर आहे बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री महोदयांच्या कार्यकाळात जिल्हा परिषदेचा विद्यार्थी घडवणाऱ्या प्रामाणिक व गुणवत्ता पूर्ण यादीत यशस्वी शाळेचे नाव करणाऱ्या शिक्षकांना न्याय मिळेल का? व शिक्षकांचे कौतुक करायला जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाला वेळ मिळेल का? अशी अपेक्षा शिक्षक व शिक्षण प्रेमीकडून व्यक्त केले जात आहे. तसेच बीड जिल्हा प्रशासनाकडून या पुरस्कारांच्या वितरणाकडे किंवा शिक्षकांच्या सन्मानाकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे बोलले जात आहे याच मुद्द्यावर पुरस्कारांचे महत्त्व कमी झाल्याची चर्चा ऐकवयास मिळत आहे म्हणून जिल्हा परिषदेच्या शाळांतील शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यास जिल्हा परिषदांमध्ये विसर पडतो किंवा या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले जात नाही. बीड जिल्ह्यामध्ये यावर्षी पुरस्कारांचे आयोजन न झाल्यामुळे शिक्षकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. याला कारणीभूत उदासिनता आणि प्रशासकीय निष्काळजीपणा होत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

------------------

### पोलीस जमादार गायक राजेश राजगुरे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन

परिवार आहे. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी बुलढाणा जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्यासह उपअधीक्षक, अनेक फौजदार, पोलीस कर्मचारी, राजकीय नेते, कार्यकर्ते, पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पार्थिवावर शेगाव येथील पाटील स्मशानभूमीत संध्याकाळी ०६:०० वाजता शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. राजगुरे परिवाराच्या कधीही भरून न निघणाऱ्या दुःखात दैनिक आरंभ परिवार सहभागी आहे.

------------------

पान १ वरून..

### पोलिस प्रशासनास तीन दलित तरुणाचा जीव घ्यायचा का?

करून जातीवाचक शिवीगाळ करून महिलेस अपमानित केले सदरील महिलेने तलवाडा पोलीस स्टेशन येथे जाऊन छेडछाड व ट्रॉसिटी क्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आज तब्बल तेरा दिवस झाले असुन आरोपी शोधण्यास पोलिस ना अपयश आले असुन तलवाडा येथील तीन दलित युवक भर पावसात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पूर्णकृती पुतळ्य शेजारी महिलेस न्याय हवा म्हणून बसले आहेत आज एका उपोषण करता ची तब्येत खालावली असुन त्याच्या पोटात त्रास होत असल्याचे सांगण्यात आले आहे तर दुसरी कडे आंदोलन कर्ते उपोषणना वर ठाम आहेत जो पर्यंत पोलिस अधिक्षक उपोषण स्थळी येत नाहीत तो पर्यंत उपोषण सोडणार नसल्याचे उपोषण कर्ते यांनी म्हणाले आहेत तलवाडा पोलीस स्टेशन मध्ये दलित समाज कार्यकर्ते आरोपीस अटक करण्या साठी पोलिस निरीक्षक मनोज निलंगेकर यांची भेट घेतली आहे व तात्काळ अटक करण्या ची मागणी करण्यात आली आहे या बाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तळवट बोरगाव येथील एका २७ वर्षीय महिलेस गावातील आरोपी सोमनाथ दिलीप गाडे हा महिलेस नेहमी त्रास देत होता ३ सप्टेंबर रोजी आरोपी बळजबरीने घरात घुसुन महिलेस तू माझ्या कडे कामाला का येत नाही म्हणुन तू मला आवडतेस असे म्हणुन तिच्या वर अत्याचार केला सदरील महिला घरा बाहेर पळत आली ही घटना भावाने सांगितली सदरील महिलेने तात्काळ तलवाडा पोलीस स्टेशन येथे जाऊन तक्रार दाखल केली व गुन्हा दाखल करण्यात आला त्यात छेडछाड व ट्रॉसिटी क्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आज तेरा दिवस झाले तरी आरोपी अटक करण्यात आला नसल्या मुळे गावातील तीन तरुण लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पूर्णकृती पुतळ्या शेजारी महिलेस न्याय मिळवून देण्या साठी लोकशाही मार्गाने आंदोलन करीत आहे आज तीन दिवस झाले असून त्यात एका राम साबळे या उपोषण कर्त्याची तब्येत खालावली असुन त्याच्या पोटात त्रास होत असल्या चे जानू लागले आहे मात्र त्याने उपचार घेण्यास नकार दिला आहे तर विनोद हातागळे, संतोष हातागळे हे जो पर्यंत पोलिस अधिक्षक उपोषण स्थळी येत नाहीत तो पर्यंत उपोषण सोडणार नसल्याचे दैनिक आरंभ चे पत्रकार सुमेध करडे यांच्या शी बोलताना सागितले आरोपींना अटक करण्या साठी तलवाडा येथील व्यापारी नी आपापली दुकाने बंद ठेवून या घटनेचा निषेध केला असुन तलवाडा उपोषण स्थळी मोठ्या प्रमाणात महिलांनी गर्दी केली होती महिलेस न्याय देण्याची मागणी करण्यात आली बीड जिल्ह्यात महिला किती सुरक्षित आहेत व त्यांना किती लवकर न्याय मिळतो? यांची चर्चा उपोषण स्थळी नागरिकांतून ऐकण्यास मिळत आहे

------------------

### बीडमध्ये मुसळधार!

वाहतूक ठप्प झाली आहे. परिस्थिती गंभीर होत असल्याने तहसील प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. सरस्वती, लेंडी नदीला पूर माजलगाव तालुक्यातील सरस्वती नदी सलग दुस-या दिवशी पूरग्रस्त झाली असून लेंडी नदीदेखील दुथडी भरून वाहत आहे. काल रात्री झालेल्या पावसामुळे नदी-नाल्यांना पूर आल्याचे चित्र दिसले. गंगामसला येथील मोरेश्वर मंदिर पाण्याखाली गेले आहे, तर साळेगाव कोठाळा येथे वीजपुरवठा खंडित झाल्याने गावक-यांना अंधारात रात्र काढावी लागली. पुलावरून पाणी वाहू लागल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. अंबाजोगाई तालुक्यात नद्यांचे विक्राळ रूप अंबाजोगाई तालुक्यातील नद्या रात्रभर झालेल्या पावसानंतर विक्राळ रूप धारण करून पात्र सोडून वाहू लागल्या. धारूर परिसरात जोरदार पाऊस धारूर तालुक्यातही पावसाने जोरदार बॅटिंग केली. धारूर, हिंगणी, कांदेवाडी आणि देवदहिफळ परिसरात नदी-नाले भरून वाहत असून नदीलगतच्या शेतांमध्ये पाणी शिरले आहे. सरस्वती नदीला आलेल्या पुरामुळे गावांमधील जनजीवन विस्कळीत झाले आहे. गोदावरी नदीला पूर, मंदिरे पाण्याखाली गेवराई तालुक्यात गोदावरी नदी क्षेत्रात सलग दुस-या दिवशी पूरस्थिती निर्माण झाली. तब्बल ३२ गावांना पुराचा वेढा बसला असून राक्षसभवन येथील शनी मंदिर आणि पांचाळेश्वर मंदिरासह अनेक मंदिरे पाण्याखाली गेली आहेत. नाथसागरातून सुरू असलेल्या पाण्याच्या विसर्गामुळे गोदावरी नदीची पातळी अधिक वाढली आहे.

# शिरूर घाटच्या शाळकरी विद्यार्थ्यांना करावी लागते गुडघाभर चिखलातून पायपीट

केज (प्रतिनिधी): शिरूर घाट ते पिंपळगाव हा रस्ता निजाम काळापासून नकाशावर असला, तरी प्रत्यक्षात तो रस्ता अद्याप पर्यंत व्यवस्थित झाला नाही. या रस्त्यावर झालेली अतिक्रमणे तसेच काही शेतकऱ्यांनी मुद्दाम केलेली आडवा-आडवी यामुळे हा रस्ता वापरण्यासाठी बंदिस्त झाला आहे. हा रस्ता तात्काळ करण्यात यावा अन्यथा विद्यार्थ्यांसह पालक आत्मदहन करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे गावातील ९०% शेतकरी, शेतमजूर व जनावरे यांची जीवनवाहिनी असलेला हा रस्ता न झाल्यामुळे हजारो हेक्टर जमीन शेतीयोग्य असूनही पडीत टाकावी लागत आहे. पिके घेण्यात मोठ्या अडचणी येत आहेत. याच रस्त्यालगत असलेली आवाड वस्ती, गीते वस्ती, केकान वस्ती येथील ग्रामस्थ व शाळकरी मुले दररोज ये-जा करताना प्रचंड त्रास सहन करत आहेत. रस्त्याच्या अभावामुळे कित्येक आजारी जनावरांना वेळेवर डॉक्टर न मिळाल्याने ती दगावली आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामस्थांनी तहसीलदार, जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषद सदस्य, आमदार यांच्याकडे वारंवार निवेदने दिली आहेत. परंतु आजपर्यंत कोणीही याकडे लक्ष दिले नाही. निवडणुकांच्या काळात अनेक आश्वासने देण्यात आली, मात्र प्रत्यक्ष कामासाठी कोणीही पुढे आले नाही. उलट, कोणी





प्रयत्न केला तरी त्यावर राजकीय दबाव टाकून आडवा-आडवी करून काम बंद पाडले जाते. हे सगळं गावातील गलिच्छ राजकारणा मुळे घडत असल्याच्या प्रतिक्रिया गावकऱ्यांनी दिले आहेत नंदकुमार मोराळे यांनी गावकऱ्यांशी चर्चा करून रस्ता करण्याचा प्रयत्न केला आणि काम सुरूही केले. परंतु काही लोकांनी मुद्दाम अडथळे निर्माण करून ते काम पुन्हा थांबवलेले आहे या प्रश्नावर सरपंच वैजनाथ सांगळे यांनी तहसील कार्यालयाला रस्ता मोजणीसाठी पत्रव्यवहार केला होता. परंतु राजकीय दबावामुळे प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले व दिलेल्या तारखेला अधिकारी उपस्थित राहिले नाहीत. सध्याच्या परिस्थितीत गावातील नागरिक अतिशय हतबल झाले आहेत. जर प्रशासनाने याची दखल तातडीने घेतली नाही, तर ग्रामस्थ विद्यार्थ्यांसह आत्मदहन करण्याच्या मनस्थितीत आहेत. प्रशासकीय यंत्रणा, कर्तव्यदक्ष तहसीलदार यांनी या प्रश्नांकडे लक्ष वेधून तात्काळ या रस्त्याचा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी गावकऱ्यांकडून करण्यात आली आहे.

## परळी ठाण्याचे पोलिस निरीक्षक धनंजय ढोणे यांचा उल्लेखनीय कामगिरीबद्दल सन्मान



परळी (प्रतिनिधी):- परळी रेल्वे स्थानकात दि.३१ ऑगस्ट रोजी पंढरपूर येथून रेल्वेने आलेल्या व रेल्वे स्थानकावर थांबलेल्या एका मजूर कुटुंबातील चिमुकलीवर घडलेल्या अत्याचार घटनेचा अवघ्या पाच तासात तपास लावून आरोपी अटक केल्याच्या कामगिरीबद्दल संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे. व कर्मचाऱ्यांचा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी प्रशस्तिपत्र देऊन गौरव केला. परळी रेल्वे स्थानकात दिनांक ३१ ऑगस्ट रोजी दुपारी अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून फरार झालेले आरोपीची ओळख. त्याला ताब्यात घेणे. गुन्हा दाखल करणे असा तपास करण्याचे परळी संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे. यांच्यापुढे आव्हान होते. दोन्ही यांनी यासाठी सीसीटीव्ही ची मदत घेत आरोपीचे फुटेज मिळवून ओळख पटवली. त्याला ताब्यात घेण्यासाठी वेगवेगळी पथके नेमून ताब्यात घेत गुन्हा दाखल केला. व अवघ्या पाच तासातच या घटनेचा तपास लावला.

संभाजीनगर पोलिसांच्या या कामगिरीचे जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी प्रस्थापित पत्र देऊन गौरव केला यावेळी पोलीस निरीक्षक, धनंजय ढोणे. पो.उपनिरीक्षक अनिल शिंदे.सहाय्यक पोलीस नरहारी नागरगोजे. पोलीस.आंमलदार भगवान चव्हाण.यांची उपस्थिती होती.

## प्रिती आण्णासाहेब ढेरे हिला गांधीनगर महाविद्यालयात 'बीडीएस' पदवीप्रदान

गेवराई,( प्रतिनिधी) : शैक्षणिक क्षेत्रात आपल्या मेहनतीच्या जोरावर यश संपादन करणारी प्रिती आण्णासाहेब ढेरे हिला गोयंका महाविद्यालय, गांधीनगर येथे बीडीएस (इरलहशश्रीेष ऊशपीरश्र डीसशशू) या पदवीप्रदान समारंभात बीडीएस पदवी प्रदान करण्यात आली.



महाविद्यालयाच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात हा सोहळा पार पडला. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, विविध विभागांचे प्रमुख, मान्यवर डॉक्टर तसेच विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. या वेळी प्रिती ढेरे हिला महाविद्यालयाकडून सन्मानचिन्ह व पदवीपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. या प्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, वैद्यकीय शिक्षण म्हणजे केवळ करिअर नाही तर रुग्णसेवेची जबाबदारी आहे. आजच्या पिढीतील डॉक्टरांनी समाजातील प्रत्येक घटकासाठी आरोग्यसेवा सुलभ करण्याचे ध्येय ठेवले पाहिजे.

बीड जिल्ह्याच्या गेवराई तालुक्यातील सुशी वडगाव येथील प्रिती आण्णासाहेब ढेरे हिनेही आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, ही पदवी माझ्या पालकांच्या आशीर्वादामुळे आणि प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळे शक्य झाली आहे. समाजासाठी चांगली सेवा करणे हेच माझे ध्येय आहे. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व पदवीधर विद्यार्थ्यांनी डॉक्टर म्हणून समाजसेवेची शपथ घेतली. समारोपाचे आभारप्रदर्शन महाविद्यालयाच्या एका प्राध्यापकांनी केले. या यशामुळे ढेरे परिवारात तसेच गावकऱ्यांत आनंदाचे वातावरण असून, प्रिती ढेरे हिच्यावर सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## भारतीय भरड धान्य व मायक्रोग्रिन्स पोषकतेचे भांडार-डॉ.शिवानंद क्षीरसागर




बीड(प्रतिनिधी)ः येथील नवगण शिक्षण संस्थेचे सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील गृहविज्ञान विभागातर्फे भरडधान्य व मायक्रोग्रीन्स तयार करणे याविषयी प्रदर्शन व प्रात्यक्षीक विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. भारतीय भरडधान्ये ही पोषकतेचे भांडार असून मधुमेह,हृदयविकार या सारख्या विकारांमध्ये उत्तम आहार होय. तसेच विविध धान्यांचे नवांकुर ज्याला मायक्रोग्रीन्स म्हटले जातात हे घटक धान्यापेक्षा ४० पट अधिक पोषणमुल्ये देतात. या भरडधान्ये व मायक्रोग्रीन्स विषयी किशोरवयीन विद्यार्थ्यांना माहिती होण्याच्या उद्देशाने सदरील प्रात्यक्षीक व प्रदर्शन गृहविज्ञान विभागामध्ये दिनांक ११ व १२ सप्टेंबर रोजी भरवण्यात आले होते.राष्ट्रीय पोषण सप्ताहनिमित्त विविध आहार व पोषणविषयक जनजागृती कार्यक्रमाअंतर्गत हे प्रदर्शन व प्रात्यक्षिक मुलांना दाखवण्यात आले व घरातील अन्नधान्यांचा उपयोग करून घरातील टाकाऊ डब्यांचा उपयोग करून तसेच यासाठी कुठलाही आर्थिक खर्च न करता घरातील महिला व विद्यार्थी स्वतःच्या स्वयंपाकघरात हे मायकोग्रीन्स उगवू शकतात.ही जनजागृती व्हावी हा मुख्य हेतू या प्रदर्शनामध्ये ठेवून हे प्रदर्शन भरवण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांनी असे नवनवीन प्रयोग आजच्या आहारपध्दतीमध्ये आवश्यक आहे हे विद्यार्थ्यांना सांगीतले.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अनिता शिंदे, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर पदवी विभागाचे संचालक डॉ.खान ए.एस., कमवि उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा.जालिंदर कोळेकर,तसेच गृहशास्त्र विभाग प्रमुख डॉ.वंदना फटाले, गृहशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक शाम कुरे,डॉ.दादासाहेब खोबरे,डॉ.मंजुषा जाधव, विभागातील सर्व कर्मचारी तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी उपस्थित होते.

## उपोषणकर्त्यांना पोलीसांच्या संगनमताने केला जातो अत्याचार पोलीस अधीक्षक, बीड यांचा बेशिस्त नियमबाह्य कारभार-माजी सैनिक वाघमारे

बीड (प्रतिनिधी):- घटनेची थोडक्यात पार्श्वभूमी अशी की, दि.१४ ऑगस्ट २०२५ पासून उपोषणकर्ते माजी सैनिक प्रकाश वाघमारे व त्यांच्या पत्नी शारदा वाघमारे जिल्हाधिकारी, कार्यालय बीड समोर उपोषण करत आहेत. एक महिन्याचा कालावधी झाला आहे. सदरचे उपोषण पोलीसांचा अत्याचार व अन्य प्रकरणी आहे. पोलीस अधिक्षक, बीड हे जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडून येणाऱ्या पत्राचे उत्तर न देता हुकुमशाहीने वागत आहेत. पदाचा गैरवापर करत आहेत. पोलीस अधिक्षक, बीड अत्याचाराचे निवारण करत नसल्याने माजी सैतिक प्रकाश वाघमारे व त्यांच्या पत्नी यांनी दिनांक ०८/०९/२०२५ रोजी जिल्हाधिकारी, बीड, विवेक जॉन्सन यांची भेट घेतली व विनंती केली. पोलीसांमार्फत आमच्यावर खेटे गुन्हे नोंद केले जात आहेत व आमच्या तक्रारी घेतल्या जात नाहत. यावर जिल्हाधिकारी, बीड विवेक जॉन्सन म्हणाले मला त्यांच्याकडून संरक्षण मिळते. मी त्यांना हा प्रकार थांबवण्याच्या सूचना देवू शकत नाही. त्यांना तुम्ही जावून भेटा असा सल्ला दिला. याचा अर्थ मुख्य पदावर येणारे हे अधिकारी एक दुसऱ्याची पाठराखण करताना दिसत आहेत. पोलीस व महसूल विभागाचे पंधरा वर्षापासून माझ्यावर अत्याचार आहेत.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या आदेश गृहीत धरून माजी सैनिक प्रकाश वाघमारे व त्यांच्या पत्नी दिनांक १०/०९/२०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोरचे उपोषण पोलीस अधीक्षक बीड यांच्या कार्यालयासमोर १२ वाजता करण्यास गेले. तेथे अर्ज ही दिला. तसेच उपोषणातील मागण्यांची सोडवणूक करावी म्हणून पोलीस मुख्यालयाच्या दर्शनीय भागासमोर हातात बॅनर घेऊन पोलीस अधिक्षक यांच्या निरोपाची वाट पाहात उभे होते.



या ठिकाणी पोलीस अधिकारी, कर्मचारी आदलून, बदलून येवून उपोषणकर्ते माजी सैनिक व त्यांच्या पत्नीला धमकावू लागले, वितांड वार्तापाल करू लागले. त्यातील एक दोघांनी असे सुचवले की, तुम्ही मुख्यालयाच्या उत्तर बाजुस करंजीच्या झाडाखाली जावून बसा, चला तिकडे म्हणून त्या झाडाकडे आम्हाला घेवून गेले व आम्ही तेथे शांत बसून होतो. हातात बॅनर त्यावर मागण्या व महामानवाचे फोटो प्रथम पंक्तीत होते.

थोड्याच वेळेत पोलीस अधीक्षक, बीड यांच्या मार्गदर्शनांने शहर पोलीस बीडचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ उपोषणकर्ते माजी सैनिक व त्यांच्या पत्नी समोर येवून ताकीदवजा दम देवून म्हणाले तुम्ही येथून लवकर बाहेर निघा, नसता कैद करून जेलमध्ये टाकीन, पोलीस अधीक्षक बीड यांच्याकडे माझी अर्धातास बैठक आहे. मी वापस येण्या अगोदर येथून निघून जा, नसता फटके मारून बाहेर काढील. शितलकुमार बल्लाळ, पोलीस अधीक्षक, बीड यांच्या कॅबीनमध्ये गेल्यावर एक मिनिटात माजी सैनिक पकाश वाघमारे व त्यांच्या पत्नीच्या समोर शासकीय फोर व्हीलर लावण्यात आली. ज्यामुळे पोलीस मुख्यालयाच्या कॅमेऱ्यात आम्ही दिसू नये. मुख्यालयाच्या मुख्य दरवाज्यापासून ज्या ठिकाणी झाडाखाली आम्हाला बसविण्यात आले. त्यांचा हेतू ही प्रशिक्षीत होता पुरावा, सबुत लपवण्याचा होता. व्हिडीओ कॅमेऱ्यात न दिसू देण्याचा अर्ध्या तासाच्या अंतराने शहर पोलीस निरीक्षक बीड शितलकुमार बल्लाळ परत उपोषणकर्त माजी सैनिक व त्यांच्या पत्नीजवळ आले. समोर येवून त्यांनी माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांच्या खांदा मानेच्या मध्ये उजव्या पायाने लाथ मारली. ज्यामुळे डोके जमीनीला आदळले व मुकामार लागला. शासकीय फोर व्हीलर व पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांनी मागविली सोबत ५ ते ७ पोलीस कर्मचारी ही बोलावले कोणीही टांगाला, पायाला हाताला धरून बल प्रयोग करत होते. एकाने छातीवर पाय ठेवला होता, बळजबरीने फोर व्हीलरमध्ये बसवत होते. शहर पोलीस स्टेशन बीड ला चला म्हणत होते. माझ्या पत्नीच्या हातात मोबाईल होता तो पोलीस निरीक्षक बल्लाळने हात मुरगुळून हिसकावून घेतले. हातातल्या बांगड्या फुटल्या, हाताला ईजा झाली. काही बलदंड लोकांच्या महिलेला वाकड्या नजरांने पाहिले तर हेच पोलीस तसा लोकांवर अनेक प्रकारचे गुन्हे लावून त्यांची जेलवारी लावतात. पोलीस निरीक्षक बल्लाळवर पोलीस अधिक्षक अशी कारवाही करणार का ? याकडे पाहाणे महत्वाचे आहे.

## लक्ष्मण महाराज मेंगडे यांना मराठवाडा भूषण पुरस्कार जाहीर

नेकनूर (प्रतिनिधी) :- भारतीय स्वातंत्र्याच्या पूर्णत्वाचा लढा म्हणजे मराठवाडा मुक्तीलढा सर्वत्र 'मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन' म्हणून साजरा केला जातो.



प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी गुरुवारी (दि.२५) सायं. ४.३० वा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड, पुणे येथे मुक्ती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले

असून, यात नेकनूरच्या बंकटस्वामी मठाचे मठाधिपती ह.भ.प लक्ष्मण महाराज मेंगडे यांना मराठवाडा भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आल्यामुळे त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. कार्यक्रमास ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे मा. अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस, पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने व बजरंग सोनवणे (खासदार, बीड) यांच्या प्रमुख उपस्थितीत आपणास सन्मानित करण्यात येत आहे. कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मराठवाड्यातील भूमिपुत्रांना मराठवाडा भूषण पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. सांप्रदायिक क्षेत्रातील या वर्षीच्या मराठवाडा पुरस्कारासाठी श्रीगुरू बंकटस्वामी संस्थानचे मठाधिपती ह.भ.प लक्ष्मण महाराज मेंगडे निवड करण्यात आली आहे.

## परळी येथे साप्तशृंगी दुर्गाउत्सव मंडळाची कार्यकारिणी जाहीर



परळी (प्रतिनिधी):- प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी परळी शहराच्या धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातील प्रसिद्ध असणार्या गणेशपार विभागातील साप्तशृंगी दुर्गाउत्सव मंडळ २०२५ ची कार्यकारनी विशाल भैया देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व परळी नगरीचे माजी नगरअध्यक्ष तथा साप्तशृंगी दुर्गा सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दीपक नाना देशमुख यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व माऊली चिकने, केशवराव जाधव, राजाभाऊ बारगजे, विजय पुजारी, विजय माळी, बालाजी घोडके, उत्तम मोरे, आबासाहेब देशमुख, प्रकाश चाचा देशमुख, अरुण तापके, राम लोखंडे, नितीन चव्हाण दत्ता काळे, बालाजी अनंतपुरे, पेंटर अनिल, जगन्नाथ सुरवसे, दीपक पूरभय्ये, राजू पूरभय्ये, अनंत देशमुख, पांडू सुरवसे, ओम दादा देशमुख सतीश सानप, मुकुंद देशमुख, सुनील देशमुख, अँड. अर्जुन सोळंके प्रदीप देशमुख, नीलेश देशमुख अरविंद देशमुख या सर्वांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये चिठ्ठी काढून लहान मुलांच्या हस्ते चिठ्ठी द्वारे खालील प्रमाणे कार्यकारिणी निवडण्यात आली अध्यक्ष दत्तात्रय तुरुप,उपाध्यक्ष, शुभम मुंडे, लखन ठाकूर,सचिव संग्राम पवार सहसचिव सौदागर शेळके, कोषाध्यक्ष तेजस देशमुख, सहकोषअध्यक्ष गोविंद चाटे, कार्यअध्यक्ष भैय्या मस्के, सजावट प्रमुख संदीप देशमुख, प्रसिद्धी प्रमुख तुकाराम चाटे, गणेश पुजारी वरील सर्व पदाधिकारी यांचे दीपक देशमुख यांनी अभिनंदन केले.

## सामाजिक कार्यकर्ते अक्षय अंधारे यांच्या वाढदिवसानिमित सामाजिक उपक्रमाचे आयोजन

धारूर (प्रतिनिधी):- धारूर शहरातील युवक सामाजिक कार्यकर्ते अक्षय अंधारे यांचा वाढदिवस १८ सप्टेंबर रोजी असल्याने त्यांनी वाढदिवसानिमित सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले आहे.



अक्षय अंधारे हे नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असतात त्याच प्रमाणे एक हात मदतीचा म्हणून गोरगरिबाना वाढदिवसाचे औचित्य साधून सेवा कारणाचे ठरवले आहे. दरवर्षी वाढदिवसच साजरा करताना इतर खर्चाला फाटा देत सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन ठेवत असल्याने याही वर्षी विविध सामाजिक उपक्रम ठेवले असुन त्यात दि.१७ सप्टेंबर वार गुरुवार रोजी शालेय साहित्य व खाऊ वाटप शहरातील केज रोड येथील मूकबधिर विद्यालयात सकाळी दहा वाजता ठेवला असून तर दि.१८ सप्टेंबर वार शुक्रवार रोजी दिवस भरात मित्रपरिवार याच्या वतीने आंबाचोंडी मंदिर येथे देवीची महाआरती असून तसेच शहरातील गरजवंत लोकांना ब्लँकेट वाटप करण्यात येणार आहेत. व ग्रामीण रुग्णालय येथे फळे , बिस्कीट वाटप करणार असल्याचे अक्षय अंधारे यांनी सांगितले असून त्यांचा मित्रपरिवार शहरात मोठ्या प्रमाणात देखील आहे नेहमी सामाजिक कार्याची आवड असलेला हा युवक युवकांपुढे एक आदर्श ठेवत इतर खर्चाला फाटा देत दरवर्षी गरजवताना मदत करत असून याच उपक्रमाचे शहरात अनेकांकडून कौतुक होत आहे व वाढदिवसानिमित्त शुभेच्छाचां वर्षाव होत आहे.

# पालकमंत्री अजितदादा जिल्हा परिषदेच्या आदर्श शिक्षकांचा पुरस्काराचा मान रखडला !

## बीड जिल्हा परिषदेला शिक्षकांचे कौतुक करायला मुहूर्त मिळेना, शिक्षकांच्या मनात असंतोष निर्माण

गेवराई (प्रतिनिधी) :- बीड जिल्हा परिषदेच्या शाळांतील शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्याची प्रक्रिया वर्षानुवर्षे चालू आहे, परंतु यावेळी वेळेवर पुरस्कार न मिळाल्यास किंवा अपयश आल्यास शिक्षकांमध्ये नाराजी पसरली. बीड जिल्ह्यात शिक्षण विभागाने शिक्षक दिनी शिक्षकांचा सन्मान करण्यात अपयश आल्याने तीव्र असंतोष व्यक्त झाला बीड जिल्हा परिषद येथिल शिक्षण विभाग शिक्षकांना पुरस्कार देण्यात अपयश आल्यास शिक्षकांच्या मनात असंतोष निर्माण झाला असून बीड जिल्ह्याच्या शिक्षण विभागा वतिने यावर्षी शिक्षक दिनाच्या निमित्ताने राबविण्यात येणाऱ्या आदर्श शिक्षकांना पुरस्काराचे मानकरी यावर्षी रखडल्याने शिक्षक वर्गातून प्रचंड नाराजीच्या सूर पाहायला मिळाला जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांना मिळणाऱ्या पुरस्कारांचा विसर पडतो हे एक गंभीर






निरीक्षण आहे, कारण अनेक शिक्षकांना त्यांच्या उत्कृष्ट कामासाठी जिल्हा आणि राज्य स्तरावर पुरस्कार मिळतात, परंतु योग्य प्रसिद्धी व प्रशासकीय सहकार्याच्या अभावी हे पुरस्कार जाहीर झाल्यावरही दुर्लक्षित राहू शकतो अतिशय खेदजनक आहे या समस्येवर तोडगा काढण्यासाठी पुरस्कारांची प्रक्रिया अधिक पारदर्शक करणे, शिक्षकांना योग्य श्रेय देणे आणि त्यांच्या कार्याची दखल घेणे आवश्यक आहे.

बीड जिल्हा परिषदेला शिक्षकांचे कौतुक करायला मुहूर्त मिळत नसल्यामुळे अनेकांना आश्चर्य वाटायला लागले ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो देशाचे दुसरे राष्ट्रपती डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्ण यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान आणि त्यांच्या कामाची आठवण म्हणून या दिवशी शिक्षकांच्या

पान २ वर...

# स्थानिक गुन्हे शाखा बीड ने दिवसा घर फोडी करणारा आरोपी केला जेरबंद

बीड (प्रतिनिधी):- जिल्हयात होत असलेल्या चो-या व घरफोड्या सारख्या गुन्हयाला प्रतिबंध होवा व गुन्हे उघडकिस यावे. यासाठी पोलीस अधीक्षक बीड यांनी स्थानिक गुन्हे शाखाचे पोलीस निरीक्षक यांचे अधिपत्याखाली वेगवेगळे तथके तयार करुन गुन्हे उघडकिस आणण्याचे आदेशीत केले होते.

पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड याचे मार्गदर्शनाखाली श्रीराम खटावकर व पथकातील



अमंलदार हे पोलीस स्टेशन बर्दापुर गुरंन २०५/२०२५ कलम ३०५ (अ) ३३१ (३) बी.एन.एस. मधील आरोपीचा आष्टी उप विभागात शोध घेत असतांना त्यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, बर्दापुर अमंळनेर पोलीस स्टेशन हद्दीत मागील काही दिवसा पुर्वी दिवसा घरफोड्या नोटया जपान काळे रा. वाकी ता. आष्टी याने व त्याचे साथीदारासह केली आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदरची माहिती पोलीस निरीक्षक स्था.गु. शाखा बीड यांना देवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली पथकातील अधिकारी

पान २ वर...

# पंचनाम्याचे सोंग - ढोंग न करता शासनाने तात्काळ मदत जाहिर करावी-अजयसिंह राऊत

## कि.आडगाव ,मंजरथ , गंगामसला सर्कल मधील कापूस पीक धोक्यात

माजलगाव (प्रतिनिधी):- मागील तिन ते चार दिवसांपासुन तालुका परिसरात झालेल्या अतिवृष्टीने खरिप पिकांचे आतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने पुन्हा पंचनाम्याचे सोंग - ढोंग न करता तात्काळ मदत जाहिर करून शेतक-यांच्या खाती जमा करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अजयसिंह राउत यांनी केली आहे.



तालुक्यामध्ये श्रावण महिण्यातच संततधार व अतिवृष्टी सदृश्य पाउस झाला होता. त्यामुळे पिकांचे नुकसान झाले होते. त्यात पुन्हा परतीच्या पावसाने शहरासह तालुका परिसराला झोडपले असुन काढणीस आलेले सोयाबीन व कपाशीचे प्रचंड नुकसान या पावसाने झाले आहे. विशेषतः किट्टी आडगाव, गंगामसला, मंजरथ सर्कलमधील कापूस पिक धोक्यात आले आहे. कारण या भागातील गोदावरी नदीच्या पुराचे पाणी उभ्या पिकांत घुसले आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत पुन्हा पावसाचा अंदाज वर्तविण्यात आलेला आहे. त्यामुळे शेतकरी पुरता खचला असुन केलेला खर्च तरी निघणार की नाही असा प्रश्न शेतक-यांना पडला आहे. विंवचनेत व आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतक-यांना दिलासा देण्यासाठी शासनाने नुकसान भरपाई साठी वेळकाढु धोरण न अवलंबीता एनडीआरएफच्या निकषानुसार सरसकट मदत जाहिर करा, त्याचबरोबर पंचनाम्याचे सोंग - ढोंग न करता तात्काळ मदत जाहिर करावी अन्यथा शासनाच्या विरोधात शेतक-यांसह आंदोलन करण्याचा इशारा देखिल सामाजिक कार्यकर्ते अजयसिंह राउत यांनी केली आहे.

# नागलवाडीची समस्या क्षणात मार्गी

## पंकजाताईंच्या धडाडीला गावकऱ्यांचा सलाम - गणेश लांडे

बीड (प्रतिनिधी) - सर्वसामान्यांच्या हाकेला तात्काळ प्रतिसाद देत समस्या मार्गी लावण्याची क्षमता पंकजाताई मुंडे यांच्यात आहे. त्यामुळेच त्या खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांचे नेतृत्व करतात, असे प्रतिपादन भाजप बीड जिल्हा सरचिटणीस श्री. गणेश लांडे यांनी केले.

शेवगाव तालुक्यातील डोंगरमाथ्यावर वसलेले नागळवाडी गाव विकासापासून वंचित राहिले होते. गावातील स्मशानभूमीत साधे शेड नव्हते, तसेच तेथे जाण्यासाठी रस्ताही नसल्याने विशेषतः पावसाळ्यात अंत्यसंस्कार करताना गावकऱ्यांना व नातेवाईकांना प्रचंड हाल सोसावे लागत.

या समस्येमुळे त्रस्त झालेल्या एका युवकाने थेट पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांना मोबाईलवर



संदेश पाठवून आपली व्यथा मांडली. पंकजाताईंनी तातडीने संबंधित युवकाला संपर्क करून समस्या जाणून घेतली व ताबडतोब आपल्या आमदार निधीतून स्मशानभूमी विकासासाठी निधी मंजूर केला. यासंदर्भात प्रशासनाला तात्काळ सूचना देऊन काही क्षणांतच नागळवाडीची समस्या मार्गी लावली. या धडाडीच्या निर्णयामुळे गावकऱ्यांनी पंकजाताईंचे मनःपूर्वक आभार मानले.

पंकजाताईंसमोर समस्या मांडली की तिचे निराकरण विलंब न लावता केले जाते, हा सर्वांचा अनुभव आहे. त्यामुळे पंकजाताई मुंडे या सर्वसामान्यांच्या मनात लोकप्रिय नेतृत्व म्हणून वारंवार सिद्ध होत आहेत, असे श्री. गणेश लांडे यांनी स्पष्ट केले.

# अतिवृष्टीने झालेल्या पाऊसामुळे आचार्य टाकळीचा पुलावुन पाणी गेले तर शेतकऱ्यांच्या पिकाचे अतोनात नुकसान

## परळी तहसीलचे व टाकळी सज्जाचे तलाठी कराड साहेब यांनी नुसकान ग्रस्थ शेतकऱ्यांची व गावकऱ्यांची घेतली भेट

सिरसाळा (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यात व परळी तालुक्यात अतिवृष्टी झालेल्या परिसरात सिरसाळा व आचार्य टाकळी कवडगाव घोडा कवडगाव घोडा व पवनेर ते पाथरी जाणारा मार्ग माजलगाव धरणाचे दार उघडे केल्यामुळे पोहनेर पुलावरून पाणी वाहत असल्याने तेही मार्ग बंद करण्यात आला आहे त्याचप्रमाणे सिरसाळा ते सोनपेठ याही नदीच्या पुलावरून पाणी जात असल्याने हे मार्ग बंद करण्यात आला आहे. यावेळेस शेतकऱ्यांचे अतोनात मोठे नुकसान झाले आहेत या पिकामध्ये कापूस सोयाबीन मूग तुर अशा



पिकांना मोठा धोका निर्माण झाला आहे तरी शेतकरी अडचणीत सापडला आहे. व उसाच्या शेतामधून पाणी वाहून गेल्याने उसाचेही मोठे नुकसान झाले आहेत. शेतकरी राजाच्या डोक्यावर मोठा डोंगर उभा राहिला आहे तरी सरकारने कर्जमाफी करून व सरसकट अनुदान तात्काळ देण्यात यावे ही शेतकऱ्यांची मागणी आहे. या दुखातून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी सरकारने त्यांच्या खात्यात तात्काळ निधी उपलब्ध करावा ही अपेक्षा शेतकऱ्यांमध्ये आहे. सिरसाळा ते आचार्य टाकळी गावाकडे जाणारा छोट्या नाल्यावर पुल हा कमी उचीचा असल्याने सिरसाळ्यापासून येणारे पाणी त्या पुलावर येते व या गावाचे काही काळ दळणवळण बंद होत आहे तरी या पुलाची उंच करण्यात यावी ही गावकऱ्यांची मागणी आहे. यावेळी परळी तहसीलचे व टाकळी सज्जाचे तलाठी कराड साहेब यांनी तात्काळ या ठिकाणी भेट येऊन गावकऱ्यांना थांबवण्याचा सल्ला दिला आहे. त्यांच्यासोबत आचार्य टाकळी येथील ग्रामपंचायत कर्मचारी कारभारी दादा किरवले व हनुमान घोडके यांनी बराच काळ थांबून मार्ग मोकळा केला पूर आलेल्या ठिकाणी उपस्थित होते.



## अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत करा युवानेते यशराज बदामराव पंडित

**गेवराई: बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात गेल्या दोन दिवसापासून अतिवृष्टी झाल्याने तालुक्यातील सर्वच पिके नेस्तनाबूत झाली आहेत. शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. त्यामुळे कोणतेही पंचनामे न करता व वेगवेगळे निकष न लावता सरसकट शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत द्यावी आशी मागणी करत युवानेते यशराज भैय्या पंडित यांनी आज तहसीलदार संदीप खोमणे यांची भेट घेऊन निवेदन दिले.या प्रसंगी शेतकरी बांधव पदाधिकारी उपस्थित होते**

*अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान*

# नुकसानीचे सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई द्या-शिंदे

नेकनूर (प्रतिनिधी) : नेकनूर मंडळासह परिसरातील भागात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे शेती पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी, अशी मागणी नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे यांनी केली आहे.



अतिवृष्टीमुळे शेतामधील कांदा, सोयाबीन पिक अक्षरशः नेस्तनाबूत झाले आहे.सोयाबीन, कापूस,उडीद, मुग पीक पाण्याखाली गेले आहेत. काही शेतकऱ्यांचे सोयाबीन पीक हाती येऊन गेले अशी परिस्थिती झाली आहे. यांसह फळबागांना देखील मोठ्या प्रमाणात हानी पोहोचली आहे. ढगफुटीसदृश्य पावसामुळे मोठ्या प्रमाणात शेती पिकाचे नुकसान झाले आहे, तसेच फळबागांना देखील या पावसामुळे मोठ्या प्रमाणात फटका बसलेला आहे. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या संपूर्ण शेतकऱ्यांच्या पिकांचे सरसकट पंचनामे करून तात्काळ शेतकऱ्यांना मदत करावी अशी मागणी नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे यांनी केली आहे.

# पोलीस जमादार गायक राजेश राजगुरे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन

बीड (प्रतिनिधी) - महाराष्ट्र च्या बुलढाणा जिल्ह्यातील पोलीस प्रशासनात जमादार असलेले तसेच गोड गळ्याचे गायक म्हणून सर्व दूर ख्याती पसरलेले राजेश राजगुरे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात बंदुकीच्या फैरी झाडून सलामी देत अंत्यसंस्कार करण्यात आले.



बुलढाणा पोलीस दलात अत्यंत मनमिळावू, साधे सरळ व्यक्तिमत्व म्हणून राजेश राजगुरे सर्वप्रिय होते. तसेच हिंदी चित्रपट सृष्टीतील पार्श्वगायक किशोर कुमार यांच्या हुबेहूब आवाजात ते गेल्या अनेक वर्षांपासून गायन करत असल्याने चांगले गायक म्हणून ते संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध झाले होते. शिवाय युट्युब वर सुद्धा त्यांचे चॅनेल असल्याने या माध्यमातून ते जवळपास जगभरात ओळखले जात होते. त्यांना दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी मध्यरात्री ०१:३० वाजता हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यातच त्यांचे निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय अवघे ५१ वर्षाचे होते. अशाप्रकारे त्यांच्या अचानक निधनाने राजगुरे परिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. चाहत्यांचा तर त्यांच्या निधनवार्तेवर विश्वास बसत नव्हता. परंतु ते आता आपल्यात राहिले नाहीत. त्यांच्या परिवाराला हे दु:ख सहन करण्याची शक्ती मिळो, आणि त्यांच्या आत्म्याला शांती लाभो. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी असा

पान २ वर...

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT